② वस्तूचे सर्व नग एकसारखे आहेत -

वस्तूचा एकजिनसीपणा म्हणजे रंग, रूप, चव, वास, वेष्टन इ. बाबतीत विशिष्ट वस्तूंचा प्रत्येक नग सारखाच आहे त्यात फरक नाही.

③ वस्तूचे सर्व नग सातत्याने उपभोगले जात आहेत -

उपभोक्ता वस्तूचे सर्व नग सलग एकापाठोपाठ एक असे उपभोगतो कारण नगांच्या उपभोगात काही काळाचे अंतर असेल तर सिमांत उपयोगिता घटणार नाही.

④ उपभोगले जाणारे नग किमान आकाराचे असावेत -

उपभोक्ता उपभोगात असलेले वस्तूंचे नग हे किमान आकाराचे असावेत. उदा. खूप तहान लागलेली असताना त्यामानाने पाणी दिले तर तहान कमी होण्याऐवजी वाढेल म्हणजेच सिमांत उपयोगिता घटणार नाही.

⑤ स्थिर परिस्थिती कायम असावी -

उपभोक्त्याची आवड तसेच त्याचे उत्पन्न, इतर वस्तूंच्या किंमती, फॅशन या उपयोगितेवर परिणाम करणाऱ्या गोष्टी स्थिर असाव्यात. यापैकी कोणत्याही एका घटकात बदल झाला तर हा नियम अनुभवास येणार नाही.

(1) ⑥ नियम / सिद्धांताचे स्पष्टीकरण -

समजा एखादा उपभोक्ता व ग्राहक एका पाठोपाठ आंब्यांचे नग सेवन करतो त्यापासून मिळणारी सिमांत उपयोगिता पुढील कोष्टकाच्या आधारे दाखवता येईल.

## (अ) कोष्टकाच्या साहाय्याने स्पष्टीकरण।

| नगसंख्या Q | एकूण उपयोगिता TU | सिमांत उपयोगिता MU |
|---|---|---|
| 1 | 8 | 8 |
| 2 | 14 | 6 |
| 3 | 18 | 4 |
| 4 | 20 | 2 |
| 5 | 20 | 0 |
| 6 | 18 | -2 |

### तक्त्याचे स्पष्टीकरण

① उपभोक्ता 1-4 नग खातो तोपर्यंत सिमांत उपयोगिता घटत असली तरी ती धनात्मक राहते म्हणून एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढलेली आहे.

② जेव्हा उपभोक्ता पाचव्या नगाचे सेवन करतो तेव्हा त्यापासून त्याला 0 उपयोगिता मिळते. एकूण उपयोगिता सर्वाधिक म्हणजे 20 इतकी येते.


③ जेव्हा उपभोक्ता सहाव्या नगाचे सेवन करतो तेव्हा सिमांत उपयोगिता ऋणात्मक होते व एकूण उपयोगिता देखील घटत जाते.

④ कोष्टकात वस्तूच्या नग संख्येच्या वाढीबरोबर सिमांत उपयोगिता क्रमश: घटत जाते.

Scanned by CamScanner

## (७) आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण -

कोष्टकात दिलेली आकडेवारी आलेखावर (दर्शवून) हा सिद्धांत स्पष्ट करता येतो.




आकृतीत अ.स अक्षावर नगसंख्या (आंबे) दर्शविली आहे तर अ.य अक्षावर आंब्यापासून मिळणारी सिमांत उपयोगिता दर्शविली आहे. आलेखावर आंब्याच्या प्रत्येक नगापासून मिळणाऱ्या सिमांत उपयोगिता बिंदू काढून ते जोडले असता जी रेषा प्राप्त होते तिला घटत्या सिमांत उपयोगिता वक्र असे म्हणतात. आकृतीत अ, ब, क, ड, इ आंब्याच्या प्रत्येक नगसंख्येपासून किती

• GOLDEN TOUCH •
PAGE NO.
DATE : / /20
• GOLDEN TOUCH •

सिमांत उपयोगिता मिळते ते दर्शविताना घटत्या सिमांत उपयोगिता वक्र डावीकडून उजवीकडे खाली उतरत गेली असे कारण प्रत्येक जादा नगाच्या उपभोगाबरोबर सिमांत उपयोगिता घटत जाते.

## सिद्धान्ताच्या ~~सिमांत~~ मर्यादा - Limitations.

पुढील काही ~~सिमांत~~ मर्यादा आहेत.

(1) उपभोक्ता हा प्रत्यक्षात विवेकी असतो प्रत्येक वेळी वस्तू उपभोगताना उपभोक्ता सारासार विचार करतोच असे नाही त्यामुळे या सिद्धांतांचे व्यावहारिक महत्त्व कमी होते.

(2) वस्तूंचे सर्व नग एकसारखे नसतात नगांमध्ये थोडा फार बदल असू शकतो त्यामुळे उपयोगिता वेगळी लाभू शकते.
उदा. पेरूचा प्रत्येक नग, वजन, चव आकाराच्या बाबत भिन्न - भिन्न असतो.

(3) वस्तूंचे नग सातत्याने व विशिष्ट क्रमाने उपभोगले जातील असे नाही.

(4) इतर परिस्थिती कायम व स्थिर नसते उपभोक्त्याची आवड, त्याचे उत्पन्न, फॅशन इ. गोष्टीमध्ये सतत बदल होत असतो. त्यामुळे उपयोगिता कमी होण्याऐवजी उत्तरोत्तर वाढत जाऊ शकते.

GOLDEN TOUCH
PAGE NO.
GOLDEN TOUCH

## 2.4) मागणीचा नियम - (Law of Demand)

घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धान्तावर मागणीचा नियम आधारीत आहे. किंमतीतील बदलानुसार मागणीत कशा रितीने आणि कोणत्या दिशेने बदल होतो किंमत बदलाला उपभोक्त्याचे आर्थिक वर्तन कसे राहते? याचे स्पष्टीकरण देण्याचे प्रयत्न या नियमात केलेले आहे.

### * नियमाचे विधान किंवा व्याख्या / संकल्पना

" इतर परिस्थिती कायम असताना वस्तूची किंमत वाढल्यास तिची मागणी कमी होते आणि किंमत कमी झाल्यास तिची मागणी वाढते "

डॉ. मार्शल यांनी हा सिद्धांत मांडलेला आहे. या विधानातील इतर परिस्थिती म्हणजे मागणीवर परिणाम करणारे घटक होत उदा. लोकांच्या जाहिरात, फॅशन, उत्पन्न इ. हे सर्व घटक स्थिर आहे असे मानून हा सिद्धांत मांडण्यात आलेला आहे.

### सिद्धांताचे स्पष्टीकरण - (Explaination)

#### (अ) कोष्टकाद्वारे स्पष्टीकरण -

वस्तूंच्या निरनिराळ्या किंमती असताना उपभोक्ता त्या वस्तूची किती नगांची खरेदी करतो हे दाखविणाऱ्या तक्त्याला मागणीचे कोष्टक किंवा मागणीचे पत्रक असे म्हणतात. किंमत आणि मागणीमधील संबंध मागणी पत्रकावरुन समजतो.

Scanned by CamScanner

DATE: / /20
GOLDEN TOUCH

## मागणी पत्रक / कोष्टक

| किंमत (₹) | मागणी (नगसंख्येत) |
|---|---|
| 10 | 5 |
| 8 | 10 |
| 6 | 15 |
| 4 | 20 |
| 2 | 25 |


वरील मागणी पत्रकात किंमत 10 ₹ असताना 5 नगांना मागणी येते. किंमत जसजशी कमी होत जाते तसतशी मागणी वाढताना दिसते. 2 ₹ किंमत असताना 25 नगांची मागणी येते. हेच मागणी पत्रक उलट वाचत गेल्यास किंमत जसजशी वाढत जाते तसतशी मागणी कमी होत जाते. यावरुन असे किंमत आणि मागणी या दोन्हीमध्ये व्यस्त संबंध असल्याचे दिसून येते.

**(b) आकृतीद्वारे स्पष्टीकरण -**

मागणी कोष्टकातील आकडेवारी आलेखावर दर्शविल्यास आपणास मागणीचा वक्र काढता येतो आणि या मागणी वक्राच्या साहाय्याने देखील हा सिद्धांत स्पष्ट करता येतो.

पुढील आकृतीत मागणीचा वक्र दर्शविलेला आहे.

Scanned by CamScanner




## मागणी आलेखरचना

आकृतीत अ.क्ष. अक्षावर मागणी नगसंख्या व आणि उभ्या अय अक्षावर वस्तूंची किंमत दर्शविली आहे. ~~किंमी~~ किंमतीच्या मागणी किती नगसंख्येची आहे यानुसार बिंदू शोधून त्या सर्व बिंदूंना जोडून जी रेषा काढली जाते तीला मागणीचा वक्र असे म्हणतात. आकृतीत ती मम आहे. हा मागणी वक्र डावीकडून उजवीकडे उतरता येतो. याचे कारण म्हणजे मागणी व किंमतीमधील व्यस्त संबंध होय. म्हणजेच किंमत वाढली असता मागणी घटते आणि किंमत कमी झाली असल्यास मागणी वाढते. मागणी वक्रावरील अ, ब, क, ड, इ हे बिंदू कोणत्या किंमतीच्या किती नगसंख्या मागणीला असेल हे दर्शवितात.

## * मागणी नियमाचे अपवाद / मर्यादा

मागणीच्या नियमाचे ~~अपवाद~~ पुढील काही अपवाद आहेत.

① हलक्या प्रतीच्या वस्तूंच्या बाबतीत (गिफेनी वस्तू) मागणीचा नियम खरा ठरत नाही हे रॉबर्ट गिफेन यांनी दाखवून दिले आहे. यांच्या मते निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची किंमत कमी - जास्त झाली तरी मागणीवर काहीही परिणाम होत नाही.

② प्रतिष्ठेच्या किंवा चैनीच्या वस्तूंच्या बाबतीत मागणीचा नियम खरा ठरत नाही. कारण श्रीमंत लोकांना अधिक किंमतीच्या वस्तू खरेदी करून श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याची हौस असते. म्हणून श्रीमंत लोकांचे वर्तन हे मागणीच्या नियमाला अपवाद ठरते.

③ जीवनावश्यक वस्तू
उदा. अन्नधान्याच्या किंमती वाढल्या तरी मागणी फारशी कमी होत नाही आणि किंमत कमी झाली तरी मागणी फारशी वाढत नाही.

④ भविष्यकाळात वस्तूंच्या किंमती आणखी कमी होतील असे उपभोक्त्याला वाटल्यास तो वर्तमान काळात किंमत कमी असूनही मागणी वाढविणार नाही. म्हणजेच भविष्यकालीन किंमती बद्दलच्या अपेक्षा मागणीच्या नियमाला अपवाद ठरतात.

⑤ सवयीच्या वस्तूंच्या बाबतीत मागणीचा नियम प्रत्यास येत नाही. म्हणजेच अशा वस्तूंच्या किंमती वाढल्या तरी मागणी फारशी कमी होत नाही.

Scanned by CamScanner

## 2.5 मागणीची लवचिकता — (Elasticity of Demand)

मागणीचा नियम वस्तूंच्या किंमतीत बदल झाला असता त्या वस्तूंच्या मागणीत कसा बदल होतो हे स्पष्ट करतो. म्हणजेच मागणीच्या नियमात किंमत आणि मागणी यांचा गुणात्मक संबंध दिसून येतो परंतु जो संबंध स्पष्ट होत नाही. त्यासाठी मागणीच्या लवचिकतेची संकल्पना विचारात घ्यावी लागते.

मागणीची लवचिकता तीन पद्धतीने मोजली जाते.

लवचिकता म्हणजे काय? लवचिकतेचे विविध प्रकार आणि उपयोग

① मागणीची किंमत लवचिकता (Price Elasticity of Demand)

② मागणीची उत्पन्न लवचिकता (Income Elasticity of Demand)

③ मागणीची छेदक लवचिकता (Cross Elasticity of Demand)

वरील तीन पद्धतीने मागणीची लवचिकता मोजता येते. मागणीची लवचिकता संकल्पना मांडण्याचे श्रेय डॉ. मार्शल यांना दिले जाते.

### ① मागणीची किंमत लवचिकता (Price Elasticity of Demand)

— डॉ. मार्शल यांनी मागणीच्या किंमत लवचिकतेलाच मागणीची लवचिकता असे संबोधले आहे.

## ① मागणीच्या किंमत लवचिकतेची व्याख्या -

① डॉ. मार्शल -
"वस्तूंच्या किंमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे मागणी परिमाणात होणाऱ्या शेकडा बदल म्हणजे मागणीची लवचिकता होय"

② प्रा. बोल्डिंग -
"किंमतीतील बदलाला मागणीकडून दिल्या जाणाऱ्या प्रतिसादाचे मापन म्हणजे मागणीची लवचिकता होय."

वरील व्याख्यांवरून वस्तूंच्या किंमतीत बदल झाला असता मागणीत ज्या प्रमाणात बदल घडून येतो ते प्रमाण म्हणजे मागणीची लवचिकता होय. मागणीच्या किंमत लवचिकतेचे सूत्र पुढील प्रमाणे

सूत्र = मागणीची किंमत लवचिकता = $\frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$

$$e_d = \frac{\%\ \text{change in Demand}}{\%\ \text{change in price}}$$

OR

$$e_{dp} = \frac{\Delta d}{\Delta P}$$

d = मागणी
Δ = बदल
e = लवचिकता
P = किंमत

उदा. किंमत 5% नी घटली त्यामुळे मागणी 10% नी वाढली तर मागणीची लवचिकता

मागणीची लवचिकता = $\frac{10}{5}$ = 2 म्हणजे येथील महाराष्ट्रीय
मागणीची लवचिकता 1 पेक्षा जास्त आहे.


**e > 1**

## * किंमत लवचिकतेचे प्रकार (Types of Price elasticity of Demand) -

किंमत बदलाला मागणी ज्या प्रमाणात प्रतिसाद देते त्यावरून किंमत लवचिकतेचे पुढील 5 प्रकार पडतात.

### (1) पूर्ण लवचिक मागणी (Perfectly elastic Demand) -


किंमतीत अगदी सूक्ष्म प्रमाणात बदल झाला असता मागणीत अतिशय मोठ्या प्रमाणात बदल घडून येतो तेव्हा मागणी पूर्ण लवचिक असते किंवा मागणीची लवचिकता अनंत राहते. पूर्ण लवचिकता दर्शविणारा मागणीचा वक्र अ. ष. अक्षाला समांतर येतो.



② पूर्ण ~~अलवास~~ अलवचिक मागणी (Perfectly

- किमतीत कितीही वाढ किंवा घट झाली तरीही मागणीत काहीही बदल होत नाही तेव्हा मागणी पूर्ण अलवचिक असते किंवा ताठर असते किंवा मागणीची लवचिकता 0 असते

उदा. किमतीत 5% बदल झाला असता मागणीत काहीही बदल होत नाही त्यामुळे मागणीची लवचिकता $\frac{0}{5} = 0$ होती राहील पूर्ण अलवचिक मागणी दर्शविणारा (अ.य) उभ्या अक्षाशी समांतर येतो.





③ एक किंवा समप्रमाण लवचिक मागणी -

किमतीत जेवढा बदल होतो तेवढाच बदल जेव्हा मागणीत होतो तेव्हा मागणीची लवचिकता समप्रमाणात असते. किंवा मागणीची लवचिकता एक असते.

उदा. किमतीत 5% नी घट झाली असता मागणीत देखील 5% नी च वाढ होत असेल तर मागणीची

लवचिकता 5% ÷ 5% = 1. इतकी राहते. एकक लवचिकता दर्शविणारा मागणी वक्र आयत हिंडवी बहिर्वक्र असतो आणि तो डावीकडून उजवीकडे उतरता असतो या मागणी वक्रावरील कोणत्याही बिंदूने सुचित होणारी लवचिकता समान असते.





कक१ = अअ१

(4) अधिक लवचिक मागणी - (मागणीची लवचिकता 1 पेक्षा जास्त)

More elastic demand - किंमतीतील बदलापेक्षा मागणीत अधिक प्रमाणात बदल होत असेल तर मागणी अधिक लवचिक राहते. किंवा मागणीची लवचिकता 1 पेक्षा जास्त राहते.

उदा. किंमतीत 2% घट झाली असता मागणीत 4% ने वाढ झाली तर मागणीची लवचिकता 4% ÷ 2%

$\frac{4\%}{2\%} = 2$ इतकी राहील अशी लवचिकता दर्शविणारा मागणी वक्र डावीकडून उजवीकडे संथ गतीने खाली उतरत येणारा येतो.




⑤ कमी लवचिक मागणी -

किमतीतील बदलापेक्षा मागणीत कमी प्रमाणात बदल होत असेल तर मागणी कमी लवचिक राहते किंवा मागणीची लवचिकता 1 पेक्षा कमी राहते.

उदा. किमतीत 10 % नी वाढ झाल्यास मागणीत 5 % नी घट होत असे, तर मागणीची लवचिकता

$\frac{5\%}{10\%} = 0.5$ इतकी राहील. अशी लवचिकता दर्शविणारा मागणी वक्र डावीकडून उजवीकडे तीव्रपणे खाली उतरणारा राहील.

